

Reg. No. F- 18307

aarambh
शोध नव्या क्षितिजांचा

PWD Reg. No. A-1089



# संगोपन
## एक सुखद सहवास

### स्वमग्न व दिव्यांग मुलांसाठी वसतीगृह

### ऑटिझम म्हणजे काय?

ऑटिझम म्हणजेच स्वमग्नता हा लहान मुलांमधील एक न्युरोलॉजिकल विकार आहे. दुर्दैवाने झपाट्याने याचे प्रमाण वाढत असून भारतात १०० मुलांच्या मागे ४ मुले स्वमग्न आढळून येत आहेत.

स्वमग्न (ऑटिस्टिक) आणि समाजातील इतर मानसिक विकलांग व्यक्ती समाजातील सर्वात दुर्लक्षित आणि दुर्बल घटक आहेत. युनायटेड नेशन्स कन्व्हेन्शन फॉर राइट्स ऑफ पर्सन विथ डिसॅबिलिटीज अपंग लोकांना समान अधिकार देते. भारतही या संस्थेचा सक्रिय सदस्य आहे. तथापि, भारतात अद्यापही स्वमग्न व्यक्तीबरोबरच इतर विशेष व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यात जगाच्या खूप मागे आहे. समाजातील प्रत्येक विशेष मूल आणि प्रौढांना समान वागणूक, सुरक्षित निवास आणि प्रेम मिळावे ही आरंभ सोसायटी फॉर ऑटिझम अँड स्लो लर्नर चिल्ड्रेन, छ. संभाजीनगर या स्वयंसेवी संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

छ. संभाजीनगर ही मराठवाड्याची राजधानी आहे. सोबतच विदर्भ, नगर, खानदेशलाही जवळचे शहर आहे. विशेष मुलांचे सर्वच पालक मुंबई, पुणे येथे जाऊन आपल्या मुलांना उपचार आणि विशेष शिक्षण देऊ शकत नाहीत. तसेच स्वमग्न मुलांसाठी वसतिगृहाची सोय मराठवाड्यातच नाही तर महाराष्ट्रातही नाही. पालकांची ही अडचण ओळखूनच छ. संभाजीनगरात संगोपन हा विशेष मुलांसाठीचा निवासी प्रकल्प उभारण्याचा निर्णय आरंभ स्वयंसेवी संस्थेने घेतला आहे.

आरंभ ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था आहे. स्वमग्न तसेच गतिमंद मुलांना शिक्षण, थेरपी आणि व्यवसाय प्रशिक्षण देण्यासाठी ४ नोव्हेंबर २०११ मध्ये आरंभची स्थापना अंबिका टाकळकर आणि बाळासाहेब टाकळकर या स्वमग्न मुलाच्या पालकांनी केली. मागील बारा वर्षात शेकडो स्वमग्न तसेच विशेष मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न संस्थेने केला आहे. मराठवाड्यात अशा स्वरूपाचे काम करणारी ही एकमेव संस्था आहे.

## ✻ प्रकल्पाची प्रगती ✻

- वाळूज लगत २ एकर जागेची खरेदी.
- पाणी आणि विजेची सोय.
- संरक्षक भिंतीचे चे काम पूर्ण.
- सर्व शासकीय अटी पूर्ण.
- आर्किटेक्चर डिझाईन पूर्ण.
- पहिल्या टप्प्यातील बांधकामास सुरुवात.
- पहिला टप्पा ऑगस्ट २०२५ पर्यंत पूर्णत्वास जाणार.

## मदतीचा प्रत्येक हात आम्हास बळ देतो

- १ चौरस फूट बांधकामासाठी मदत- रु. २५००/-
- १ ब्रास वाळू - रु.३०००/-
- किमान १ हजार लाल विटा - रु. ६०००/-
- किमान १ टन स्टील - रु. ५००००/-
- प्रति खोली फर्निचर - रु. ८००००/-
- १०० सिमेंट बॅगचा खर्च - रु.३७०००
- १ वर्ग खोली बांधकाम खर्च - रु.१२,०००००/-
- १ थेरपी रूमचा खर्च - रु.१३,०००००/-

- संस्था धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत.
- ८० G प्रमाणपत्र.
- १२ A प्रमाणपत्र.
- CSR - १ प्रमाणपत्र.
- NGO दर्पण प्रमाणपत्र.
- नॅशनल ट्रस्ट रजिस्ट्रेशन.

आपली देणगी ८० G अंतर्गत आयकर मुक्त असेल.

## ✻ अकाऊंट डिटेल्स ✻

| | |
|---|---|
| Account Name | : AARAMBH Society For Autism & Slow Learner Children, Aurangabad |
| Account No | : 62244857159 |
| Bank Name | : COSMOS Bank |
| AC Number | : 91205010109925 |
| Account Type | : Saving Account. |
| IFSC Code | : COSB0000912 |
| Branch name | : Dashmeshnagar. |
| Branch Code | : 00912 |

Gpay Number - 8275284178

संगोपान प्रकल्प पत्ता - हनुमंतगाव, गट क्र.१४, ता. पैठण, छ. संभाजीनगर (औरंगाबाद)

## ♦ Our Partners ♦

setco, देणे समाजाचे, NRB Bearings, लोकसत्ता, MCX, SOM, SBI, MGPL, Gattefossé, Yeshshree, Vikram Tea, HDFC Bank Parivartan, Masala King Exports, Peacock, Vinodrai, Endress+Hauser, MAN Energy Solutions, give India


### ♦ Address ♦

Aarambh Autism School, Plot No.2, Medical Housing society,
Darga-Sutgirni Road, Darga parisar, Chh.Sambhajinagar 431005 (MH)

### ♦ Registered Office ♦

B-14, Zabinda Residency, Deva nagari,
Darga Chowk, Chh.Sambhajinagar, 431005, Maharashtra, India.

**Con.:** 8275284178, 9075094994 | **Website :** www.aarambhtrust.in

**Email id :** aarambha smcenter@gmail.com
ambikanidhu@gmial.com | aarambhsangopan@gmail.com

Aarambh Aurangabad www.arambhtrust.in @aarambh



♦ REG No.: F - 18307 ♦ PAN No.: AADTA7120L
♦ TAN No.: NSKA07456B ♦ SOCIETY REG No.: MAH369/1

## संगोपन विषयी

स्वमग्न मूल जस जसे मोठे होत जाते तस तसे पालक वृद्ध होत जातात. मुलांची ताकद वाढते आणि पालकांची कमी होत जाते. अशा परिस्थितीत या मुलांना सांभाळणे अतिशय कठीण होते. या टप्प्यावर पालकांना मदतीची आणि मुलांना योग्य संगोपनाची गरज असते. आरंभ संस्थेने हाच विचार करून वसतिगृह उभारण्याचा निर्णय घेतला आहे. १८ वर्षे आणि त्या वरील स्वमग्न तसेच इतर विशेष मुलांना राहण्यासाठी संगोपन ही सर्वसोयींनीयुक्त निवासी सोय असणार आहे.



## ● उद्दिष्ट्ये ●



१. स्वमग्न अर्थात ऑटिझम आणि इतर अपंग व्यक्तीच्या गरजांना केंद्रित ठेवून संगोपन प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे. निवासी संकुलातील प्रत्येक खोली, व्हरांडे, किचन आणि इतर सर्वच बांधकाम स्वमग्न आणि अपंग व्यक्तींना समोर ठेऊन रचना करण्यात येत आहे. त्यामुळे त्यांना अडथळामुक्त वातावरण मिळेल.

२. आमच्या नंतर मुलाचे काय हा प्रश्न दिव्यांग मुलांच्या पालकांना कायम भेडसावत असतो. संगोपन निवासी प्रकल्प पालकांना या अस्वस्थतेतून दिलासा देणारा ठरणार आहे.

३. स्वमग्न आणि अपंग मुलांना समाजाच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठी आरंभ प्रयत्न करत असते. त्यासाठी शाळा, थेरपी सेंटर, व्यवसाय प्रशिक्षण असा विविध स्तरावर काम करण्यात येणार आहे.

४. विशेष मुलांचा लघुउद्योग – मुलांना व्यवसाय प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी लघुउद्योगाची निर्मिती करणे यासाठी आरंभ संस्था प्रयत्न करत असून त्याची पायाभरणी दोन वर्षांपूर्वीच आरंभाने केली आहे.

५. पालकांसाठी निवास व्यवस्था – पालकांना वसतिगृहात त्यांच्या विशेष मुलांसोबत काही दिवस राहता यावे यासाठी पालकांसाठीही निवास व्यवस्था करण्याचा आरंभचा मानस आहे.

६. शिघ्र निदान शिघ्र उपचार केंद्र – स्वमग्न तसेच इतर दिव्यांग मुलांना तत्काळ थेरीपी मिळाव्यात यासाठी सध्या सुरु असलेले शिघ्र निदान शिघ्र उपचार केंद्र अद्ययावत इमारतीत स्थलांतरीत करण्याचे आरंभचे प्रयत्न आहेत.





## ● प्रकल्पाची वैशिष्ट्ये ●

- १८ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या ६० मुले आणि ४० मुलींसाठी निवासी सुविधा.
- ऑटिझम फ्रेंडली पायाभूत सुविधा.
- प्रशिक्षित कर्मचारी, प्रत्येक मुलामुलींची वैयक्तिक काळजी.



- १८ वर्षांवरील मुलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र
- स्विमिंग पूल आणि सेन्सरी गार्डनच्या सुविधा.
- तत्पर वैद्यकीय सुविधा.
- आरंभ ऑटिझम शाळा.

- कौटुंबिक सहभागातून मुलांसाठी वैयक्तिक प्रशिक्षण कार्यक्रम.
- स्वमग्न आणि अपंगासाठी सर्वसमावेशक शिक्षण.
- प्रशिक्षित शिक्षक वर्ग.
- शिघ्र निदान शीघ्र उपचार केंद्र.
- विशेष शिक्षणासाठी प्रशिक्षण केंद्र.
- विशेष मुलांचे लघुउद्योग केंद्र.



## Aarambh's Awards








